# मा. प्रा. सुधीर उमाजी मेश्राम

कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## यांचे दीक्षांत समारंभप्रसंगी स्नातकांना संबोधन

दीक्षांत समारंभाचे प्रमुख अतिथी प्रा. सुखदेवजी थोरात, विविध विद्याशाखांचे सन्माननीय अधिष्ठाता, मा.व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, मा.अधिसभा व विद्या परिषदेचे सदस्य, विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांचे आजी-माजी सदस्य, उपस्थित मान्यवर संस्थाचालक, प्राचार्य, विविध प्रशाळांचे संचालक, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पत्रकार आणि प्रिय स्नातकहो ! दीक्षांत समारंभप्रसंगी मी आपले स्वागत करतो.

आपल्या विद्यापीठाच्या २० व्या पदवीप्रदान समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून आपल्याला विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष तथा आयसीएसएसआर चे विद्यमान अध्यक्ष मा. प्रा. सुखदेवजी थोरात  उपस्थित आहेत, ही आनंदाची बाब आहे. उच्च्च शिक्षणाला मा.प्रा.थोरात यांनी नवे आयाम दिले आहेत. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत शिक्षण घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षपदापर्यंत त्यांनी गतिमान प्रवास केला. तो सर्वांना प्रेरणादायी ठरणारा आहे. त्यामुळेच हे प्रेरणादायी व्यक्तिमत्व आपल्यासमोर आणावे यासाठी विद्यापीठाने आज त्यांना या कार्यक्रमासाठी मुद्दाम निमंत्रित केले. त्यांनी विद्यापीठाच्या या निमंत्रणाचा स्वीकार केला, त्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

मित्रांनो, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वाटचालीचे आपण साक्षीदार आहात. बघता बघता हे विद्यापीठ २१ वर्षांचे झाले. हजारो विद्यार्थी या विद्यापीठातुन आजवर पदव्या घेऊन बाहेर पडले, आणि वेगवेगळ्या क्षेत्रात या विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. आजही या पदवीप्रदान सोहळ्यात अनेक विद्यार्थी पदवी घेऊन उद्याच्या उज्वल आणि प्रगतीशील प्रवासासाठी सज्ज झाले आहेत. या सर्वांना शुभेच्छा देतो.

या पदवीप्रदान सोहळ्याच्यानिमित्ताने, विद्यापीठाच्या गेल्या वर्षभरातील वाटचालीचा आढावा सादर करताना आपल्याशी हितगुज साधावे असे वाटते. विद्यापीठाच्या वाटचालीत अत्यंत महत्वाचा समारंभ याच सभागृहात दोन महिन्यांपूर्वी म्हणजे दि. २४ मार्च, २०१२ रोजी पार पडला. भारताच्या महामहिम राष्ट्रपती डॉ. प्रतिभाताई पाटील यांना विद्यापीठाने डी.लिट. या सन्माननीय पदवीने

गौरविले. विद्यापीठाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरलेला हा समारंभ आपल्या सर्वांच्या साक्षीने झ ाला. या दीक्षांत सभागृहाचे आणि अनुसुचित जातीच्या मुलींसाठीचे वसतिगृह याशिवाय, अनुसुचित जमातीच्या मुला-मुलींसाठीच्या वसतिगृहाचा कोनशिला समारंभही महामहिम राष्ट्रपतींच्या उपस्थितीत पार पडला. देखणा आणि नेटका झालेला हा समारंभ आपल्या सहकार्यामुळे यशस्वीपणे पार पडला हे सांगताना मला विशेष आनंद होत आहे.

या विद्यापीठाने विद्यार्थी हाच प्रामुख्याने केंद्रबिंदु मानुन वाटचाल सुरू केलेली असल्यामुळे आपल्या विद्यार्थ्यांना  अधिक चांगल्या पायाभुत सुविधा देण्यावर विद्यापीठाने भर दिला आहे. याचाच एक भाग म्हणून जवळपास १०५० विद्यार्थ्यांच्या क्षमतांचे चार वसतिगृह या परिसरात आता उभे राहाणार आहेत. विद्यापीठात शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाची चांगली सोय व्हावी, निवासाअभावी उच्चशिक्षणापासून ते वंचित राहू नयेत याची काळजी आम्ही घेत आहोत. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थिनींसाठी या विद्यापीठात १०० विद्यार्थिनी क्षमतेचे नवे वसतिगृह बांधण्यात येणार आहे. यासाठी २ कोटी ९९ लाख रूपये खर्च अपेक्षित असून त्यापैकी एक कोटी रूपयांचा निधी विद्यापीठाला प्राप्त झाला आहे. यापूर्वी केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालयाच्या बाबू जगजीवनराम छात्रावास योजनेतंर्गत अनुसुचित जातीच्या २०० विद्यार्थिनींच्या वसतिगृहाला मंजूरी दिली आहे. यासाठी २ कोटी रूपयांच्या निधीचा पहिला हप्ता प्राप्त झाला आहे. तसेच अनुसुचित जमातीच्या ५०० विद्यार्थी व २५० विद्यार्थिनींसाठी देखील वसतिगृह उभे राहाणार आहे. याशिवाय, विद्यापीठात स्थापन झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन केंद्रात प्रवेशित अनुसुचित जातीच्या ५० विद्यार्थिनींसाठी वसतिगृह बांधकामाचा प्रस्तावही अंतिम टप्प्यात आहे.

काही प्रमुख योजना आणि त्यासाठी केलेल्या तरतूदींचा उल्लेख मला याठिकाणी करावासा वाटतो. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेसाठी ४५ लाखांऐवजी ६० लाखांची तरतूद यंदा करण्यात आली आहे. संशोधनाला चालना मिळावी यासाठी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे यामध्ये प्राध्यापकांना सहभागी होता यावे म्हणून ६ लाखाऐवजी १० लाखाची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये संशोधनाची संस्कृती निर्माण व्हावी यासाठी महाविद्यालयीन शिक्षकांना समाजपयोगी संशोधन प्रकल्प राबविण्यासाठी २ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच विविध अध्यासन केंद्रांच्या गतिमान कामासाठी  कार्यान्वित व्हावी यासाठी २० लाखाची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी कल्याण कार्यक्रमासाठी ४० लाखाची भरभक्कम अशी तरतूदही विद्यापीठाने केली आहे. २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ आणि

संलग्नित महाविद्यालयांचे मेजर रिसर्च प्रोजेक्टचे ३५ तर मायनर रिसर्च प्रोजेक्टचे ११८ प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्यात आले आहेत.

अभिमानास्पद कामगिरी -

विद्यापीठाला अत्यंत अभिमान वाटावा अशा काही घटना गेल्या काही महिन्यात घडल्या आहेत. लाईफ सायन्सेस विभागाच्या अमोल हिवराळे या विद्यार्थ्याला स्विडीश, सी.डी. पाटील या विद्यार्थ्याला फ्रान्स आणि राहूल साळूंखे या विद्यार्थ्यांला इस्त्राईल शासनाची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. याशिवाय, याच विभागातील मेघराज कदम या विद्यार्थ्याला ५० हजार रूपयांचा रॅनबॅक्सी नॅशनल अवार्ड प्राप्त झाला. पर्यावरणशास्त्र प्रशाळेचा विद्यार्थी धनंजय सरोदे याला फिनलँड शासनाने ९ महिन्यांसाठी सरकारी खर्चाने संशोधनासाठी आमंत्रित केले आहे. यंदा प्रथमच आंतरविद्यापीठ अविष्कार या राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेत विद्यापीठाने ७ पारितोषिके पटकावून सांघिक तृतीय पारितोषिक प्राप्त केले आहे.

या विद्यापीठाने सामाजिक बांधिलकी जपली आहे. याच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतुन राष्ट्रीय सेवा योजनेचे काम अत्यंत चांगल्या पध्दतीने सुरू आहे. याची दखल घेऊन राज्य सरकारची २०१०-२०११ चे तीन पुरस्कार आपल्या विद्यापीठाला प्राप्त झाले आहेत. यामध्ये, उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना कार्यरत विद्यापीठ, सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक आणि उत्कृष्ट विद्यार्थी स्वयंसेवक अशा तीन पुरस्कारांचा समावेश आहे. अशा सर्व घटनांनी विद्यापीठाच्या नावलौकिकात अधिकाधिक भर पडत आहे.

उद्योजकांशी संवाद -

`प्रयोगशाळा ते जमीन` या अभिनव उपक्रमाला विद्यापीठाने प्रारंभ केल्यानंतर ग्रामीण आणि दूर्गम भागातुन अत्यंत चांगला प्रतिसाद गेल्या सहा महिन्यांपासून मिळतो आहे. पंधरापेक्षा अधिक ठिकाणी शेतकऱ्यांच्या कार्यशाळा व चर्चासत्रे घेऊन जैवतंत्रज्ञानाद्वारे शेती उत्पादनात वाढ करण्याचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष समस्या जाणून घेऊन प्रयोगशाळा आणि शेतकरी यांना एकत्रित आणणारा असा हा समाजाभिमूख उपक्रम आहे. यासंदर्भात प्रशिक्षण दिले जाणार आहे. थेट शेतकऱ्यांपर्यंत संशोधन पोहोचविण्याचा उपक्रम राबविणारे उमवि हे राज्यातील एकमेंव विद्यापीठ आहे. याला जोडूनच मोबाईल व्हॅनद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची रूची निर्माण होण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

प्रयोगशाळा ते जमीन या उपक्रमासोबतच आता विद्यापीठाने पुढचे पाऊल उचलले असून ``प्रयोगशाळा ते उद्योग`` हा नवा कार्यक्रम हाती घेतला आहे. खानदेशात अधिक रोजगार देणारे उद्योग यावेत यासाठी थेट उद्योजकांशी संवाद साधला जात आहे. यासाठी उद्योजक आंतरसंवाद कक्ष स्थापन करण्यात आला आहे. उद्योग क्षेत्रांना त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कौशल्य असलेले मनुष्यबळ हवे असते. आजच्या या ज्ञानयुगात उद्योग क्षेत्र सातत्याने विस्तारत आहे. त्यांच्या गरजा बदलत आहेत. या क्षेत्राला अधिक चांगले मनुष्यबळ देण्यासाठी या विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. त्यासोबतच अभ्यासक्रमामध्येही बदल करून रोजगाराभिमूख अभ्यासक्रम कसे राहतील यावर भर देण्यात येत आहे. या भागात अधिक चांगले कारखानदार यावेत व त्यांनी उद्योग सुरू करावेत यासाठी विविध पातळ्यांवर चर्चा सुरू आहे.

या विद्यापीठाचा विद्यार्थी आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांसमवेत जोडला जावा यादृष्टीने सामंजस्य करार केले जात आहेत. विद्यापीठ आणि अमेरिकेतील कायुगा कम्युनिटी कॉलेज यांच्यात दोन महिन्यांपूर्वी सामंजस्य करार झाला. या करारामुळे खानदेशातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षणाचे दालन खुले झाले आहे. विविध विद्याशाखेतंर्गत पदवी स्तरावर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कायुगा कम्युनिटी कॉलेज न्यूयार्क मध्ये समकक्ष अभ्यासक्रमही शिकता येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक व न्याय विभागातंर्गत येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण आणि संशोधन संस्थेद्वारे आपल्या विद्यापीठात अनुसुचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांचे प्रशिक्षण देण्यासाठी निवासी स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू झाले आहे. त्याला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. या विद्यापीठाचा विद्यार्थी स्पर्धात्मक परीक्षांमध्ये मागे राहू नये यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. विशेष आनंदाची बाब म्हणजे प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग संचलित स्पर्धा परीक्षा केंद्राचे ८ विद्यार्थी नुकतेच एमपीएससी तर्फे झालेल्या पोलिस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेत यशस्वी ठरले आहेत. अवघ्या दोन वर्षात या केंद्राने हे यश संपादन केले आहे.

उपकेंद्रांची सक्षमता -

विद्यापीठाची उपकेंद्रे अधिक बळकट व्हावीत आणि त्याठिकाणी शैक्षणिक, सामाजिक उपक्रम राबविले जावेत यासाठी विद्यापीठाने विशेष लक्ष देण्यास सुरूवात केली आहे. या उपकेंद्रांसाठी ७९ लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रताप तत्वज्ञान केंद्र अमळनेर, नंदूरबार येथील एकलव्य प्रशिक्षण केंद्र, धुळे येथील महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र या तीनही ठिकाणी विविध उपक्रम राबविले जात आहेत. प्रताप तत्वज्ञान केंद्रात तत्वज्ञान आणि व्यवस्थापन विषयक पदवी आणि पदव्युत्तर वर्ग

सुरू करण्यात येणार आहेत. याशिवाय, तेथील परिसर सुशोभित केला जाणार आहे. शेतीविषयक संशोधन केंद्रही तेथे उभे करण्यात येणार आहे. अमळनेर ही सानेगुरूजींची कर्मभूमी. त्यामुळे सानेगुरूजींच्या स्मृतिप्रित्यर्थ या केंद्रात सानेगुरूजी स्मारक कक्ष सुरू करण्याचा संकल्प विद्यापीठाने केला आहे. एप्रिल महिन्यात विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक तत्वज्ञान केंद्रात घेण्यात आली. धुळे येथील महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्राचा विकास केला जाणार आहे. त्याठिकाणी गांधी विचारांवर आधारित पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याचा मानस आहे. नंदूरबारच्या एकलव्य प्रशिक्षण केंद्रात स्पर्धात्मक परीक्षांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. याठिकाणी विद्यार्थ्यांना कौन्सिलींगचीही सुविधा उपलब्धकरून देण्यात आली आहे. या उपक्रेंद्रासाठी नवीन अत्याधुनिक साधनसामुग्री पुरविण्यात आली आहे. विद्यापीठासोबतच उपकेंद्रांमध्येही ॲडव्हान्स डिजिटल सिस्टीमचा वापर करण्यात येत आहे. यासाठी डिजिटल पोडियम, इंट्रॅक्टीव स्मार्ट बोर्ड, अत्याधुनिक डिसप्ले बोर्ड आणि टेलिकॉन्फरन्सींगसाठीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

नवीन विभाग -

स्पर्धेच्या युगात विद्यार्थी हा येणाऱ्या सर्व आव्हानांना सामोरा जाण्यास तयार व्हावा यासाठी विद्यापीठ आपल्या अभ्यासक्रमांमध्ये बदल करीत असते. विद्यापीठाने नुकतीच पूर्णपणे प्रशाळा पध्दत स्वीकारली आहे. विद्यापीठात आता १४ प्रशाळा राहणार असून, यामध्ये काही विभागांचा समावेश करण्यात आला आहे. स्कूल ऑफ लॉ, स्कूल ऑफ थॉटस् या दोन नवीन प्रशाळा प्रस्तावित आहेत. स्कूल ऑफ लॉ मध्ये ``डिपार्टमेंट ऑफ लॉ`` आणि ``डिपार्टमेंट ऑफ ह्यूमन राईटस्`` सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय, काही प्रशाळांमध्ये ``डिपार्टमेंट ऑफ सायकॉलॉजी`, ``डिपार्टमेंट ऑफ आंबेडकर थॉटस`, ``डिपार्टमेंट ऑफ ट्रायबल स्टडीज ॲण्ड रिसर्च सेंटर`, ``डिपार्टमेंट ऑफ फिलॉसॉफी``, ``डिपार्टमेंट ऑफ उर्दू``, ``डिपार्टमेंट ऑफ ऐशंट लॅग्वेजेस``, ``डिपार्टमेंट ऑफ स्टडी ऑफ लोकल डायलेक्टस्``, ``डिपार्टमेंट ऑफ फॉरेन लॅग्वेजेस`` या विभागांचे प्रस्ताव आहेत. याशिवाय, ``स्कूल ऑफ थॉटस अंतर्गत महात्मा फुले स्टडी ॲण्ड रिसर्च सेंटर``, ``स्वामी विवेकानंद स्टडी ॲण्ड रिसर्च सेंटर``, ``बुध्दीस्ट स्टडीज ॲण्ड रिसर्च सेंटर`` ही प्रस्तावित आहेत. खानदेशातील ग्रामीण आणि दूर्गम भागातील महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारा ``ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ`` हा दीड वर्षाचा अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे. ``हेल्थ असिस्टंट`` हा सहा महिन्यांचा अभ्यासक्रम नुकताच सुरू झाला आहे.

विद्यार्थ्यांसाठी विविध योजना -

या विद्यापीठातील बहूतांश विद्यार्थी ग्रामीण, आदिवासी भागातून आलेले असल्यामुळे त्यांना आर्थिक पाठबळाची गरज असते. त्यासाठी विद्यापीठामार्फत कुलगुरू आर्थिक संशोधन योजना, एकलव्य विद्याधन योजना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह सहाय्य योजना, कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विद्यार्थी दत्तक योजना, कुलगुरू वैद्यकीय निधी योजना सुरू आहेत. या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळतो. याशिवाय, विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येऊ नयेत याकडेही विद्यापीठाचे लक्ष आहे. विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीत विद्यार्थी साहाय्य केंद्र सुरू करण्यात आले आहे. बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत इंटरनेट सर्फिंग सुविधा नुकतीच सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण व्हावे यासाठी कुलगुरूंची हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. कुलगुरूंचा दैनंदिन कार्यक्रम एसएमएस द्वारे सर्वांना कळविला जातो. याशिवाय, प्रशासकीय इमारतीतील डिसप्ले बोर्डावरही दैनंदिन कार्यक्रम जाहीर केला जातो. आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाचा परिचय व्हावा व नावलौकिक वाढावा या हेतूने ``फॉरेन स्टूडंट सेल`` स्थापित करण्यात आला आहे. ग्रामीण व दूर्गम भागातील अडचणी लक्षात घेऊन विद्यापीठाची अद्ययावत अशी मराठी वेबसाईट सुरू करण्यात आली असून, आजच आपले अतिथी डॉ.सुखदेवजी थोरात यांच्या हस्ते या वेबसाईटचे उद्‌घाटन करण्यात आले आहे. विद्यापीठातील पाण्यची वाढती गरज भागविण्यासाठी पाणी पुरवठा योजनेचा दुसरा टप्पा तयार झाला आहे. या योजनेद्वारे दररोज ७ ते ८ लाख लिटर पाणी उपलब्ध होणार आहे. या पाणी पुरवठा योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे उद्‌घाटनही प्रमुख अतिथी डॉ. थोरात यांच्या हस्ते होत आहे. परीक्षांचे निकाल वेळेवर लावण्यासाठी हे विद्यापीठ कटिबध्द आहे. परीक्षार्थींची संख्या दिवसें-दिवस वाढते आहे. कमी मनुष्यबळ असतानाही परीक्षेच्या व निकालाच्या कार्यपध्दतीत अमूलाग्र सुधारणा करण्यात आल्या असून, ऑक्टोबर मधील बहूसंख्य परीक्षांचे निकाल ४५ दिवसांच्या आत जाहीर करण्यात आलेत.

बाराव्या योजनेतील प्रस्ताव -

बाराव्या पंचवार्षिक योजनेत विद्यापीठाने अत्यंत कल्पक असे प्रस्ताव सादर केले आहेत. इमारत बांधकाम व परिसर विकास, ग्रंथालय, उपकरणे, संशोधन आणि विस्तारीकरण यासाठी भरीव निधीची मागणी करणारे हे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासनाला विद्यापीठाने ८० कोटी रूपयांचे तर विद्यापीठ अनुदान आयोगाकडे जवळपास ७५ कोटीचे प्रस्ताव विद्यापीठाने सादर केले आहेत.

कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना -

विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी हे विद्यापीठाच्या दैनंदिन कार्यातील महत्वाचे घटक आहेत. त्यांच्या कल्याणाचा साकल्याने विचार केला जात असतो. त्या अनुषंगाने, विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रात संगणकीकृत नेत्र तपासणी यंत्राची सोय नुकतीच उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यापीठ हे गावापासून बरेच लांब असल्यामुळे अनेकदा रात्री, अपरात्री विद्यापीठ कॅम्पस वरील विद्यार्थी, कर्मचारी यांना रूग्णालयात जाण्याची असुविधा पूर्वी जाणवत होती. ही अडचण लक्षात घेऊन विद्यापीठ सेवेत नवीन रुग्णवाहिका दाखल झाली आहे. कर्मचाऱ्यांना कायम निवासाची व्यवस्था उपलब्ध व्हावी यासाठी घरबांधणी कर्जासाठी अर्थसंकल्पात ५ कोटीची भरीव तरतूद करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना विविध कार्यक्रम घेता यावेत यासाठी शिक्षकेतर कर्मचारी भवन व बहूउद्देशीय सभागृह उभारण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. यासाठी व्यवस्थापन परिषदेने तत्वतः मान्यता दिली आहे. या सभागृहासाठी ४० लाखाची तरतूदही करण्यात आली आहे.

अपेक्षा -

अध्ययन, अध्यापन व संशोधन याद्वारे विद्यापीठाची ओळख निर्माण होत असते. त्यामुळेच या सर्व आघाड्यांवर हे विद्यापीठ नेत्रदीपक कामगिरी करीत आहे याचा विशेष आनंद होतो आहे. मित्रांनो, विद्यापीठाची ही वाटचाल सांगतांना आपल्याकडूनही माझ्या काही अपेक्षा आहेत. पदवी घेऊन तुम्ही आज बाहेर पडत आहात. उच्च शिक्षणाची संधी प्राप्त झालेले तुम्ही तरूण आहात. अजूनही उच्च शिक्षणापासून वंचित असणारा मोठा घटक समाजात आहे. या घटकासाठी आपण काही करणार आहोत की नाही याचा साकल्याने विचार करायला हवा. ही पदवी प्राप्त केल्यानंतर आपण यापुढे चिंतन करावे. कारण शिक्षणातून जीवनमूल्यांची ओळख होत असते. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी आपल्याला शिक्षणाचा दर्जा वाढवावा लागणार आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीला लागावी यासाठी महाविद्यालयांना पायाभूत सुविधा वाढवाव्या लागतील. गुणवत्ता वाढीसाठी परिश्रमाशिवाय पर्याय नाही. या परिश्रमाला कल्पकता, नियोजन, व्यवस्थापन कौशल्य याची जोड द्यावी लागणार आहे. शिक्षणासाठी समान संधी सर्वांना मिळणे आवश्यक आहे. आज ज्ञानाधिष्ठीत समाजाची गरज आहे. अशा वेळी ज्ञानापासून कुणी वंचित राहू नये याची काळजी आपण घ्यायला हवी. या पदवीचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी करण्याचा संकल्प करू या. मला खात्री आहे, या विद्यापीठाचा विद्यार्थी सामाजिक भान असणारा आणि सामाजिक बांधिलकी जपणारा आहे. त्यामुळेच

या पदवीचा उपयोग तो समाजाच्या व देशाच्या कल्याणासाठी करेल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि आपल्या भावी प्रवासासाठी शुभेच्छा देतो !

धन्यवाद !

जय महाराष्ट्र  - जय भारत

***